दि बोदवड सार्व.को-ऑप.एज्यु.सोसा.लि.बोदवड संचालित-कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बोदवड.ता.बोदवड,जि.जळगांव.
आवक पत्र क्रमांक: 225
दिनांक 18/12/2020

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव Formerly North Maharashtra University,Jalgaon)

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र. कबचौउमवि/७-अ/४२६३/२०२० दि. १७/१२/२०२०

प्रति,

१. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयाचे मा. प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. संचालक
२. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळांचे मा. संचालक आणि शैक्षणिक विभागाचे प्रमुख...

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील होणा-या हिवाळी परीक्षांचे आयोजन ऑनलाईन पध्दतीने करणेबाबत...**

**संदर्भ:- विद्यापीठाचे पत्र क्रमांक:-**
१.कबचौउमवि/७-अ/३०३९/२०२०, दि. ०५/११/२०२०
२.कबचौउमवि/७-अ/४०८८/२०२०, दि.०३/१२/२०२०
३.कबचौउमवि/७-अ/४२१२/२०२०, दि. १२/१२/२०२०

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये, आपणास शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशित विद्यार्थांच्या नियमित सत्राच्या विषयांच्या व पूर्वीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण/विषयांच्या गुणात सुधारणा करु इच्छिणा-या विद्यार्थ्यांच्या हिवाळी परीक्षांचे आयोजन वस्तुनिष्ठ बहुपर्यायी MCQ पध्दतीने दि. १० डिसेंबर, २०२० पासून ऑफ लाईन पध्दतीने करण्यात येणार असून कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव विचारात घेऊन परीक्षा पध्दतीत बदल झाल्यास, याबाबत कळविण्यात येईल. असे नमुद केलेले आहे. तसेच संदर्भीय पत्र क्र. २ नुसार दिनांक १० डिसेंबर, २०२० ते दिनांक २४ डिसेंबर, २०२० या कालावधीत सर्व पुनर्परीक्षांर्थी (Backlog) विद्यार्थ्यांच्या सर्व सत्राच्या प्रात्यक्षिक व अंतर्गत परीक्षांचे आयोजन करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच संदर्भीय पत्र क्र. ३ मध्ये नमुद केल्यानुसार सदरची परीक्षा दिनांक २८.१२.२०२० पासून वस्तुनिष्ठ बहुपर्यायी M.C.Q. पॅटर्ननुसार ऑफलाईन पध्दतीने घेण्यात येइल. असे कळविण्यात आलेले होते.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भाव लक्षात घेता विद्यार्थ्यांची सुरक्षा, आरोग्याचे गांभीर्य लक्षात घेवून विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार ज्या विद्यार्थ्यांनी डिसेंबर २०२० च्या परीक्षेसाठी परीक्षा अर्ज सादर केलेला आहे, अशा विद्यार्थ्यांच्या सर्व अभ्यासक्रमाच्या **परीक्षा फक्त ऑनलाईन पध्दतीने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (MCQ) स्वरुपात** Smart Phone/Laptop/Desktop with Web camera याद्वारे घेण्यात येईल.

तसेच ऑनलाईन परीक्षेचे सॉफ्टवेअर हाताळणी व सरावाकरिता सराव चाचणीचे विद्यार्थ्यांसाठी आयोजन करणे आवश्यक असल्याने, याकरिता दिनांक २८.१२.२०२० पासून सुरु होणा-या हिवाळी परीक्षा **दिनांक ०५ जानेवारी २०२१ पासून, आयोजित करण्यात येणार असून या परीक्षांचे सुधारीत वेळापत्रके यथावकाश विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.**

संदर्भीय पत्र क्र. ३ नुसार हिवाळी परीक्षेचे आयोजन संदर्भातील सुचना कळविण्यात आलेल्या असून यातील बाब क्र. (२) वगळून इतर सर्व सुचना लागू राहतील.

सदर बाब विद्यार्थी व सर्व संबधित घटकांच्या निदर्शनास आणून देऊन परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी विद्यापीठास सहकार्य करावे.

कळावे,

Exam Committee
Shri. Savadekar - Web publication
19/12/20

आपला विश्वासू

(भ.प्र. पाटील)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

पत्र पेटी क्र.: ८०, उमवि, जळगांव दूरध्वनी क्र.: (०२५७) २२५८४०७,२२५७३०१ ते २२५७३०५ फॅक्स क्र.: (०२५७) २२५८४०७
Post Box No: ८०, Umavinagar,Jalgaon, Telephone No: (०२५७)२२५८४०७,२२५७३०१ to २२५७३०५, Fax No: (०२५७) २२५८४०७